# प्रकरण सहावे

## समारोप आणि निष्कर्ष

## ::*:: प्र क र ण स हा वे ::*::

## *** समारोप आणि निष्कर्ष ***

प्रा. श्री.म. माटे या विचारवंत लेखकाच्या आत्मचरित्राची - "चित्रपट : मी व मला दिसलेले जग" याची पाहणी करताना असे आढळले की माटे यांनी रंगविलेला चित्रपट वैशिष्टयपूर्ण आहे.

पहिले वैशिष्टय असे की, आत्मसमर्थनाची किंवा आत्मश्लाघेची भूमिका येथे दिसत नाही. जी जीवनकथा घडली ती ब-याचशा तटस्थपणाने माटे सांगतात. स्वत:कडे अलिप्तपणाने पाहण्याची वृत्ती मोठमोठया लेखकांत आणि ज्ञानवंतातही फार कमी दिसते याचे कारण माणूस आत्मप्रेमाची चौकट बहुधा ओलांडू शकत नाही. माट्यांच्या ठायी स्वत:कडे तिऱ्हाईतपणे पाहण्याची ही वृत्ती होती. यामुळेच "चित्रपट" हे एक प्रांजळ, प्रामाणिक माणसाचे सरळ आत्मकथन बनले आहे. वृध्दपणी माणसांचे बरेचसे अहंकार गळून जातात. आपण कोणीतरी विशेष आहोत इतरांपेक्षा आपले कर्तृत्व फार मोठया दर्जाचे आहे असे माणसाला म्हातारपणात वाटत नाही. मात्र हे म्हातारपण ज्ञानवंतांचे म्हातारपण असले पाहिजे. म्हणजे मग स्वत:ला मोजण्याची त्याच्या हातातली फूटपट्टी व्यवस्थित असते. आत्मपरीक्षण करण्याची तर्ककठोर वृत्ती देखील माट्यांच्या ठायी होती याबाबतीत अनेक संदर्भ देता येतील.

दुसरे वैशिष्टय असे की, आपल्या पदरात पडलेल्या जीवनाला स्वप्रयत्नाने माटे यांनी आकार दिला. मनासारखा डाव पडला नाही म्हणजे पुष्कळशी माणसे वैतागतात. खेळण्यातले त्यांचे लक्ष कमी होते. किंवा काही आततायी माणसे डाव उधळूनही टाकतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रस्तुत आत्मचरित्रावरुन माटे हे एक प्रयत्नवादी, पुरुषार्थी, सुसंस्कृत आणि स्वार्थत्यागी, समाजहितैषी, उदारमतवादी गृहस्थ आहेत. हे दिसून येते. दु:खे, आपत्ती, दारिद्र्य यांच्याशी झगडा देत ते आपले पाऊल प्रगतीच्या वाटेने टाकतात. हे या पुस्तकावरुन दिसते. आपल्या जीवनाविषयी माटे म्हणतात. -

"मी स्वत: फार समाधानात आहे. देवाने माझे लहानपण जरी कांहीशा विपत्तीत घालविले, तरी जन्मभर त्याने मला सुखांत ठेवले आहे. घरदार करुन मी पुणे शहराचा रहिवासी झालो आहे; आणि केवळ वाङ्मयाच्या बळावर, अंगासरसाच का होईना, माझा प्रपंच मला चालविता येत आहे. सामान्यपणे पाहता मला कीर्तीचा लाभहि चांगला झाला; आणि अखिल मराठी मुलखांत समाजसेवक, साहित्यिक, वक्ता व लेखक या नात्याने माझे नाव मशहूर झाले आहे. माझे स्वभावदोष व आग्रह ही लक्षांत घेतां मला मिळालेले हे बक्षीस खरोखरच समाधानकारक आहे. माझी मुलगी एम.ए. साहित्यरत्न असून गुजराथेत एम.ए. पर्यंत हिंदी भाषा शिकविते. माझे जामात एम.ए.,पीएच.डी. असून गुजराथी भाषेत सुध्दा ते अर्थशास्त्र शिकवितात. माझा मुलगा एम.ए., पीएच.डी झालेला असून एस.पी. कॉलेजात लेक्चरर आहे; आणि माझी सून पदवीधर झालेली आहे. माझी दोन्हीकडील नातवंडे सुस्वरुप, बुध्दिमान आणि छोळकर आहेत; आणि सौ. लक्ष्मीबाई या माझ्या पत्नी तर, माझ्या स्वत:च्या सौभाग्याची केवळ पताकाच होत !"[१]

या निवेदनात माटे यांच्या मनातली तृप्ती जशी प्रकट झाली आहे त्याप्रमाणेच त्यांच्या वृत्तीतला विनय देखील व्यक्त झाला आहे. खरे तर माटे हे मराठी साहित्यातले एक दिग्गज मानले जातात. पण आपल्याविषयी लिहिताना त्यांनी कोठेही एखादे अतीशयोक्तीकडे

झुकलेले विशेषण योजले नाही. आत्मचरित्राच्या शेवटी त्यांनी आणखी काही लिहिले आहे ते म्हणतात.

"१९१० साली इंटरमीजिएट नापास होवून अठरा रुपयांवर एका लहानशा शाळेत मास्तरकी करणाऱ्या मला इतपत वैभव लाभले, हेही मी भाग्यच समजतो. माझी भाग्यरेषा मला उंचावता नेता आली असती; पण त्यासाठी मला सद्सद्विवेक बुध्दि आणि स्वाभिमान यांची मान मुरगाळावी लागली असती. वीस वर्षे पर्यंत दलित वर्गाची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले; आणि त्या कामी तन,मन धन करून मी अत्यंत सचोटीने झटलो. यामुळे तर मला शाश्वतचे सुख लाभले आहे असो. झाले आहे ते सर्व चांगलेच आहे. देवाने एकाहत्तर वर्षापर्यंत मला जिवंत ठेवून आपले हे सुंदर विश्व डोळांभर पाहू दिले, हे त्याचे केवढे तरी ऋण मी लागतो. कांही जीवित अजून उरलेले असले तर त्यांत काय घडून येईल, हे मला कसे बरे सांगता येईल."[२]

आत्मकथनातले सार या उताऱ्यात जणू उतरले आहे. माट्यांच्या मनाचा हा प्रांजळ अविष्कार वाचकांना प्रसन्न करतो. काही तडजोडी केल्या असल्या आणि स्वाभिमानाची जाणीव गुदमरुन टाकली असती तर आपण यापेक्षाही उच्च स्थानी पोहोचलो असतो हे माट्यांचे विधान सत्यपूर्ण आहे. त्यांनी सत्ताधाऱ्यांशी जमवून घेतले असते किंवा त्यांची थोडीफार खुशामत केली असती तर माट्यांना काही महत्वाची स्थाने आणि मानाची पाने मिळू शकली असती. पण त्यांच्या मनाचा पीळ दृढ होता. विवेकबुध्दी शाबूत होती. त्यामुळे वाकडया वाटेने प्रवास करण्याची इच्छा त्यांना झाली नाही. आपल्या आयुष्यात त्यांनी मोठमोठे तत्वनिष्ठ विद्वान आणि

त्यागी माणसे पाहिलेली होती. लो. टिळक, म.गांधी यांच्यासारखे आदर्श नेते त्यांच्या दृष्टीसमोर होते. शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यागपूर्वक काम करणारी शिक्षणप्रेमी मंडळी त्यांना दिसत होती. आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, अण्णासाहेब कर्वे अशा समाजसुधारकांच्या कार्याशी त्यांच्या मनाचे धागे जुळलेले होते. त्यामुळेच सदाचाराची पाऊलवाट त्यांनी कधी सोडलेली दिसत नाही. याचा परिणाम म्हणजे आपल्या जीवनावर ते संतुष्ठ राहिले. ज्याने आपली कर्तव्ये मन:पूर्वक केलेली असतात, आणि ज्याचा जीवितविषयक दृष्टिकोन सत्वसंपन्न असतो तो अंतर्यामी नेहमीच आनंदी असतो. दु:खातही प्रसन्न असतो. उन्हातही त्याला शीतल चांदण्याची अनुभूती घेता येते.

श्री. माटे यांनी आपले काही स्वभाव दोषही प्रामाणिकपणे सांगितले आहेत. " If I were young again " या कवितेची आठवण त्यांना होते असे त्यांनी म्हटले आहे. आपण पुन्हा तरुण झालो तर केलेल्या कित्येक चुका आता करणार नाही असे ते म्हणतात. "मतप्रदर्शनाच्या सवयीने आणि मला काय वाटले हे सांगण्याच्या हौसेने माझे फार नुकसान केले आहे."[3] असेही माटे यांनी शेवटी उद्गार काढले आहेत. स्थूलमानाने ते बरोबर आहेत. कारण "मला काय वाटते ?" या नावाचे एक सदर पुण्याच्या 'प्रभात' या वृत्तपत्रातून चालवित होते. काही वेळा त्यांचे लेखन अत्यंत सडेतोड स्पष्ट व कठोर व्हायचे. पंडित नेहरू संबंधी त्यांनी इतरांना न आवडणारे असेच काहीतरी मत प्रदर्शन केले त्यामुळे त्यांना पुष्कळच मानसिक त्रास सहन करावा लागला. नेहरूप्रेमी लोकांनी त्यांचा निषेध केला. कोणी धामक्याही दिल्या असाव्यात. माट्यांनी क्षमा मागणारी पत्रके स्वत:च्या हातांनी संभाजी पुलावर उभे

राहून वाटली. असा उल्लेख काही जाणकार करतात. तो खरा असो की खोटा असो, मत प्रदर्शन करण्याची अनिवार ऊर्मी कांही वेळा माटे यांना संकटग्रस्त करायची असे दिसते. पण हा दोष आहे की गुण आहे हे मात्र प्रत्येकाने आपल्या प्रकृतीप्रमाणे ठरवायचे आहे. जे आपल्याला वाटते ते लोकक्षोभाची पर्वा न करता सांगणे आणि त्यामुळे होणारा त्रास धैर्याने सहन करणे हा एक सद्गुण मानावा लागेल. पण माटे हे स्पष्टवक्ते असले तरी ते अखेर मध्यमवर्गीय चौकटीत वाढलेले होते. त्यामुळे लोकक्षोभापुढे उभे राहणे त्यांना जमण्यासारखे नव्हते.

आपल्या आत्मवृत्ताबद्दल शेवटच्या परिच्छेदात माटे म्हणतात या चित्रपटात, "अमुक यावयास हवे होते ते आले नाही. तमुक यावयास नको होते ते आले असे अनेक वाचकांना वाटण्याचा संभव आहे. तसेच आत्मवृत्तही मला सगळे देता आलेले नाही. पण किती लिहावयाचे व प्रकाशकांनी भार उचलावयाचा यालाही काही मर्यादा असते. म्हणून महत्व, रूचि व उपयुक्तता याकडे लक्ष देऊन जेवढा तपशील सांगता आला तेवढा सांगितला आहे. नव्या पिढीतील तरुणांना गेल्या अर्धशतकाची ओळख या चित्रपटदर्शनाने ब-या प्रकारची होईल असा माझा अंदाज आहे. सध्याच्या जर्जर अवस्थेतही परमेश्वराने माझ्याकडून ते लिहून घेतले, हे माझ्यावर त्याचे अनंत उपकार आहेत."[४] येथे त्यांनी आपले आत्मकथन संपवले आहे.

साडेपाचशे पृष्ठांचा हा ग्रंथ यापेक्षा मोठा होऊ शकला असता पण लेखकाने काही मर्यादा अपरिहार्य म्हणून पाळल्या आहेत. जर्जर अवस्थेत लिहिलेला हा ग्रंथ आहे. माटे यांचा हा अखेरचाच ग्रंथ होय. वार्धक्याच्या कठीण स्थितीत अधिक लिहिणे त्यांना कदाचित शक्य नव्हते. प्रकाशकाने सुध्दा काही भाग वगळलेला दिसतो.

पण नव्या पिढीतील तरुणांना माटे यांच्या कालखंडाची अनेकांगी ओळख व्हावी या अंदाजाने हे आत्मकथन लिहिले गेले. या कथनातून माटेकालीन महाराष्ट्र व त्यातील सामाजिक वाङ्मयीन आणि राजकीय चळवळीचे व कित्येक व्यक्तींचे जे चित्र उमटले आहे ते महत्वपूर्ण आहे. यामुळेच ते केवळ आत्मवृत्त न राहता माटेकालीन समाजाचा हा संक्षिप्त पण रोचक असा इतिहास झाला आहे. या चित्रपटात केवळ माट्यांची प्रतिमा प्रकाशझोतात आहे असे म्हणता येणार नाही. काही ठिकाणी तर माटे बाजूला उभे आहेत. आणि समाज व समाजातील भिन्न भिन्न आंदोलने अधिक प्रकाशात आले म्हणून सामाजिक दृष्टया या आत्मकथनाला संदर्भ ग्रंथाचे महत्व प्राप्त झाले आहे.

श्री. माटे यांनी अस्पृष्टांच्या शिक्षणासाठी अनेक वर्षे जे परिश्रम केले त्याचे चांगले संघर्षपूर्ण दर्शन यात घडत आहे. विशेषत: माट्यांच्या मनातली विचार भावनाची द्वंद्वे यातून दिसतात. एका शाळा मास्तराने दलित समाजात विद्या पोहचविण्यासाठी जो त्याग केला तो केवळ मौलिक नसून अनेकांना स्फुरण देणारा आहे. माटे यांनी केलेल्या त्यागामुळे केवळ त्यांच्या व्यक्तित्वाची नव्हे तर शिक्षक जमातीची आणि मानव्याची-ही उंची काही प्रमाणात वाढली याची जाणीव या आत्मकथनातून प्रकट होते.

आज १९९५ साली अस्पृश्य जमातीचे प्रश्न काही अंशी सुटत आहेत. गांधी, आंबेडकरांच्या प्रयत्नाने तथाकथित अस्पृश्य समाजाकडे पाहण्याची दृष्टी आता बदलली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मुलभूत कार्यामुळे दलित समाज आपल्या पायावर स्वाभिमानाने उभा रहात असल्याचे दृष्य आज दिसत आहे. पण माटे यांनी ज्या कालखंडात अस्पृष्टांच्या शिक्षणाला पुण्यासारख्या परंपरावादी शहरात हात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

घातला त्यावेळची परिस्थिती बरीचशी प्रतिकूल होती. माटे मास्तरांना लोक उपहासाने व अधिक्षेपाने "महार माटे" म्हणत असत. पण ही उपाधी सुध्दा माट्यांनी अभिमानाने स्वीकारली. अस्पृश्यता निवारणाची वाट तयार करण्याचे काम ज्या समाज सुधारकाने केले त्यात श्री.म. माटे यांचा उल्लेख अटळपणे करावा लागतो. या सर्व दृष्टीनी पाहिल्यास प्रस्तुत आत्मचरित्र हे एका विद्याप्रेमी अध्यापकाचे आणि समाजप्रेमी समाजसुधारकाचेही आहे. त्यामुळेच ही साहित्यकृती समाज आणि वाङ्मय या दोन्ही गोष्टीने लक्षणीय स्वरूपाची आहे. आत्मचरित्राचे दालन माटे यांनी समृध्द केले यात कोणताही संदेह नाही.

श्री.म. माटे यांचे समग्र आत्मचरित्राचे वाचन केल्यानंतर आपल्या मनावर त्यांच्या व्यक्तित्वाचा स्पष्ट ठसा उमटतो. त्यांचे जीवन, शिक्षण, साहित्य आणि समाजसेवा यांना वाहिलेले होते. एक सद्गृहस्थ म्हणूनही त्यांची प्रतिमा स्पष्टपणे आत्मचरित्रातून दिसते. शिक्षणाच्या क्षेत्रात एक शिक्षक म्हणून त्यांनी जो लौकिक मिळविला तो असामान्य प्रतीचा होता याबद्दल शंका नाही. शाळेत आणि महाविद्यालयात दोन्ही ठिकाणी त्यांनी आपल्या अध्यापनाची मुद्रा उमटविली. महाराष्ट्रातल्या नामवंत व्यासंगी- अध्यापन कुशल आणि विद्यार्थीप्रिय असे जे प्राध्यापक होते त्यांत माट्यांचे स्थान उच्च प्रतीचे आहे. हे स्थान त्यांना सतत व्यासंगामुळे मिळाले. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या पदरात दररोज काहीतरी नवीन टाकले पाहिजे, केवळ पुस्तके शिकवणारे अध्यापक असतात. पण माटे आपल्या विद्यार्थ्यांना पुस्तकांतून जीवनाकडे घेऊन जात असत. सारासार विचार करण्याची शक्ती त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांत निर्माण केलेली होती. त्यांना

केवळ पुस्तकी बनवले नाही. याचे कारण "मास्तर माटे" हे केवळ पुस्तकजीवी नव्हते, ते पुस्तकांत रमले हे खरे पण त्यापेक्षा आजूबाजूच्या परिस्थितीचे व समाजाचे त्यांनी जाणीवपूर्वक अध्ययन केले होते. समाज हाच एक मोठा ग्रंथ मानून त्याचा त्यांनी आयुष्यभर अभ्यास केला होता. म्हणूनच त्यांचे एक नामवंत विद्यार्थी डॉ. वि.म. कुलकर्णी त्यांच्या विषयीच्या आठवणी सांगताना म्हणतात. -

"शिक्षणा इतके"च समाजविषयक व साहित्यविषयक कार्य माटे यांनी केले ते सारे जवळून पाहण्याचे भाग्य आमच्या पिढीला लाभले. आपल्या कार्यात तरुण विद्यार्थ्यांना सामील करून घ्यावयाची ही त्यांची एक हातोटी होती. समाजसेवेची अल्पस्वल्प दीक्षा आपल्या "तरुण मित्रांना" देण्याची त्यांना हौस होती. आणि कोणत्याही गोष्टी समाजदृष्टया विचार कसा करावयाचा हे सांगण्याकडे त्यांचा विशेष कल असे."[5]

श्री. माटे यांचे शेकडो शिष्य महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राच्या बाहेर पसरले आहेत. 'माटे यांच्यासारखा शिक्षक आपल्याला लाभला म्हणूनच आपल्या मनाची आणि विचारांची बैठक पक्की होऊ शकली.' अशा अर्थाचे विचार त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहेत. अलिकडच्या कालखंडात आदर्श शिक्षकांना पुरस्कार आणि पारितोषिक देण्याची शासकीय प्रथा आहे. माट्यांच्या काळात बहुधा ही प्रथा नसावी. पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे शिक्षक आदर्श ठरतो असा अलिकडे एक गैरसमज उत्पन्न झालेला दिसतो. माट्यांनी वर्षानुवर्षे आत्यंतिक निष्ठेने केवळ शाळा कॉलेजातच नव्हे तर अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊनही शिकविले. एक समाजचिंतक वक्ता म्हणून त्यांनी सभा संमेलनातून जी असंख्य भाषणे केली त्यातूनही

त्यांच्यातला शिक्षकच प्रकट झाला आहे. आचार्य अत्रे यांच्याबरोबर त्यांनी जो वाद केला त्या वादातली त्यांची भूमिका संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या एका अभिरुचिसंपन्न शिक्षकाचीच होती. सारांश - नवनव्या विचारांची स्फुरणे विद्यार्थ्यांना देणाऱ्या माट्यांचे शिक्षक म्हणून जे व्यक्तिमत्व या आत्मचरित्रात दिसते ते खरोखरच प्रभावी आहे.

श्री. माटे हे तर मराठी साहित्यातले एक जेष्ठ लेखक आहेत. मराठी निबंधात त्यांनी समृध्द भर टाकली. निबंधकार आणि प्रबंधकार माटे म्हणून त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. ज्याचे चिंतन व्यापक आणि बहुविध असते असा मनुष्य लेखक न झाला तरच नवल ! मराठीतल्या पहिल्या प्रतीच्या लेखकांत माट्यांचा उल्लेख करावाच लागेल. "उपेक्षितांचे अंतरंग" सारखा कथा संग्रह हे मराठी कथा साहित्याचे एक अमूल्य लेणे आहे. पन्नाशी ओलांडल्यानंतर हा समाजचिंतक शाळामास्तर ललित लेखन करतो आणि थोड्याच दिवसात मराठीतला अव्वल दर्जाचा कथाकार बनतो याचा अर्थ माट्यांचा पिंड हा जसा शिक्षकाचा होता तसाच तो कलादृष्टी असलेल्या लेखकाचाही होता. त्यांच्या कित्येक कथा तर वाचकांच्या हृदयात अढळ झाल्या आहेत. "सावित्री मुक्यानेच मेली", "बन्सीधर तू आता कोठे रे जाशील ?", "नाथनाक व देवकाई यांची काव्झोप" अशा अनेक कथांचा उल्लेख करता येईल. तळमळीचा समाजसुधारक हा लेखक झाल्या शिवाय रहात नाही हे माटे यांच्या बाबतीत खरे ठरले.

माट्यांचे आत्मचरित्र वाचल्यानंतर असे लक्षात येते की, हे आत्मकथन एका जिवंत मनाच्या धडपडणाऱ्या समाजनिष्ठ सुधारकाचे आणि जागृती करु इच्छिणाऱ्या शिक्षकाचे आहे. आपल्या आयुष्यातील वैयक्तिक सुखदु:खाचे प्रसंग माट्यांनी फारसे सांगितले नाही.

सामाजिक दृष्टया ज्या प्रसंगांना महत्व आहे त्यांनाच त्यांनी स्थान दिले आहे. कुटुंब जीवनासंबंधी देखील फार थोडे उल्लेख सापडतात. आपल्या पत्नी विषयी एक दोन ठिकाणी त्यांनी भावना वेगाने, कृतज्ञतेने लिहिले आहे. पण यापलिकडे वैयक्तिक मानापमान आणि कौटुंबिक सुखदु:खे याबद्दल त्यांनी लिहिले नाही. याचाच अर्थ हा "चित्रपट" माट्यांनी पाहिलेल्या जगाचा आहे. आपल्यावर त्यांनी कॅमेरा खिळवून ठेवलेला नाही. हे आत्मचरित्र माटे नावाच्या व्यक्तीचे आहे तसेच या व्यक्तीच्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चित्रही आहे. एका चांगल्या आत्मचरित्राचा आदर्श माट्यांनी निर्माण केला आहे. विचारशील मनुष्य कसा जगतो. आणि त्यांनी कसे जगावे याचेच जणू अप्रत्यक्ष दिग्दर्शन त्यांनी केले आहे. मराठी साहित्यातल्या चांगल्या ग्रंथात या आत्मचरित्राचा समावेश निश्चितच होऊ शकतो.

00 *÷*÷*÷*÷* 00

## ** संदर्भ सूची **


१] माटे श्री.म. : "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" व्हीनस प्रकाशन, पुणे-२, पृष्ठ-४४९, ४५०

२] तत्रैव, पृष्ठ-४५०,४५१

३] तत्रैव, पृष्ठ-४५१

४] तत्रैव, पृष्ठ-४५१,४५२

५] श्री.म. माटे जन्मशताब्दी विशेषांक : महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक २३८, जुलै ते सप्टेंबर १९८६ पृष्ठ-७५.


00 *÷*÷*÷* 00